**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३२३६ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| गणेश श्रीपती मोरे | प्राचार्य, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे | अतिरिक्त कुलसचिव, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे |

**( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २९.०५.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २९.१२.२०२३ | आर्थिक वर्ष २०२०-२१ चे महाविद्यालयाचे पदवी, पदवीत्तर, सीपीसी, भारतीयम, सिल्व्हर ज्युबिली या विभागाचे आय-व्ययपत्रक व ताळेबंदपत्रक त्यासोबतच्या परिशिष्टासह साक्षांकित माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २५.०१.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर देवुन माहिती देता येत नाही, असे कळविले आहे."

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, "अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि. १७.०४.२०२४ रोजी निर्णय पारित केला आहे."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २५.०१.२०२४ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवुन आदेश पारित केले आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केली आहे. अपिलार्थी आज रोजी सुनावणीस गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुन घेता आले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३२३६ / २०२४ / पुणे 10168/2025 दिनांक - 20/11/25